# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स : २२६१२१०२

तार : EDUTECH E-mail:- desk9@dte.org.in Web:- http://www.dte.org.in


**तात्काळ / महत्वाचे**

क्र.९/तंशिसं/आ.बै./२०१०/

दिनांक : 27 DEC 2010

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/ पुणे/ नाशिक/ अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर.

**विषय :- २०१०-२०११ च्या खर्चाच्या आढावा बैठकीबाबत...**

संदर्भ :- आज दिनांक २७/१२/२०१० रोजी मा.सचिव यांनी घेतलेली आढावा बैठक.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी दिनांक २७/१२/२०१० रोजी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये संचालनालयाच्या विविध योजनांतर्गत खर्च हा अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (बीडीएस) उपलब्ध असलेल्या अनुदानाच्या तुलनेत कमी प्रमाणात झाला असल्यामुळे नाराजी व्यक्त केली असुन, सदर खर्च हा ३१ डिसेंबर,२०१० पर्यंत अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (बीडीएस) उपलब्ध झालेला निधी १०० टक्के खर्ची करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, आपण आपल्या विभागांतर्गत असलेल्या सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांशी प्रत्यक्ष संपर्क साधून खालील मुद्दयांबाबत तात्काळ कार्यवाही करणेचे निर्देश आपल्या स्तरावरुन देवून त्याबाबत पाठपुरावा करावा.

१) संस्थांमध्ये सुरु असलेल्या बांधकामांबाबत अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (बीडीएस) उपलब्ध असलेले अनुदान व प्रत्यक्ष झालेला खर्च, बांधकामाची सद्यःस्थिती इत्यादीबाबतची माहिती बांधकाम विभागाकडून तात्काळ घेऊन दिनांक २९/१२/२०१० पर्यंत सादर करावी.

२) ग्रंथालयाचा विकास या अंतर्गत उपलब्ध असलेले अनुदान अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (बीडीएस) प्रमाणे ३१ डिसेंबर,२०१० पर्यंत संपूर्ण खर्च करण्यात यावे.

३) यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेले अनुदान अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (बीडीएस) प्रमाणे ३१ डिसेंबर,२०१० पर्यंत खर्च करणेचे दृष्टीकोनातून या संचालनालयाशी त्वरित संपर्क साधावा.

तरी वरील मुद्दयांच्या अनुषंगाने वितरीत करण्यांत आलेले अनुदान हे अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (बीडीएस) उपलब्ध असलेल्या अनुदानानुसार १०० टक्के खर्च होईल याबाबत दक्षता घेण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील प्राचार्यांना सुचना देण्यात याव्यात व त्याबाबतचा पाठपुरावा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. सु. का. महाजन)

प्र.संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**तात्काळ/महत्वाचे**

पृष्ठांकन पत्र क्र.विकाऔ/लेखा-१/२०१०/ ८८८२

दिनांक : 28 DEC 2010

प्रति,

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद.

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद/ जालना/अंबड/ जिंतुर/ नांदेड/हिंगोली/ उस्मानाबाद/ शा.निवासी म.तं.लातुर/ पु.ला.शा. तंत्रनिकेतन, लातुर/बीड

**विषय : २०१०-११ च्या खर्चाच्या आढावा बैठकीबाबत.**

उपरोक्त विषयांकित पत्रात दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी तसेच बांधकामासंदर्भातील माहिती तंत्रशिक्षण संचालनालयास पाठवुन त्याची एक प्रत या कार्यालयास अग्रेषित करावी.

**प्रशासकीय अधिकारी,**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद